(SJIF) Impact Factor-8.575 ISSN-2278-9308

ISSUE No- (CCCLIII ) 353

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## May -2022

## Emerging Trends in Higher Education and Human Rights.




Prof. Virag.S.Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

Dr.Vijay M. Gawande
Editor,
Off.Principal,

**Smt. Savitabai Uttamrao Deshmukh Mahavidyalay,**
**Digras, Dist. Yavatmal**

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

Impact Factor – 8.575 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## May -2022

ISSUE No- (CCCLIII ) 353

## Emerging Trends in Higher Education and Human Rights.

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr.Vijay M. Gawande**
Editor,
Off.Principal,
**Smt. Savitabai Uttamrao Deshmukh Mahavidyalay, Digras, Dist. Yavatmal**

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 22 | National Policies For Women Empowerment: An Indian Scenario **Dr Manda V. Thengne** | 67 |
| 23 | A Lookout On Women's Health: Stress And Improvement **Syed Anisoddin** | 71 |
| 24 | Women Health Issues And Strategies For Improvement **Prof. Dr. Dhanraj Khirade** | 74 |
| 25 | Violence against Women as a Human Rights Concern **Prashant Vasant Ransure** | 77 |
| 26 | Status of Academic Libraries in the Higher Education. **Dr.Avinash Uttamrao Jadhao** | 80 |
| 27 | Physical And Mental Health Of Women In India **Avinash V. Kharat** | 82 |
| 28 | Trend Of Digitization In Teaching And Learning Process Of Higher Education **Dr. Nilesh N. Chotiya** | 85 |
| 29 | Teaching English Through " Online Mode" **Ku. Priyanka Basaveshwar Ruikar** | 87 |
| 30 | दहशतवाद : लो शाहीसमोरील ए आव्हान. प्रा. विजय गावंडे | 90 |
| 31 | जागतिकीकरण आणि संस्कृतीवर प्रभाव डॉ. दामोदर दुधे | 93 |
| 32 | आधुनिक जीवनशैलीमुळे निर्माण झालेल्या आजारावर उपाययोजना प्रा.डॉ. माधुरी अरविंद देशमुख | 97 |
| 33 | महिलांची सुरक्षितता व मानवाधिकार प्रा. निता पांडे (पाठक) | 101 |
| 34 | महिला सक्षमिकरणासाठी राष्ट्रीय धोरणाचे योगदान प्रा.डॉ. असीम खापरे | 104 |
| 35 | कौटुंबिक ताणाचा गृहिणीच्या आरोग्यावर होणारा परिणाम डॉ. लीना सुनील कांडलकर | 108 |
| 36 | महिलांची सुरक्षितता आणि मानवाधिकार डॉ.जयवंत पिराजी जुकरे | 112 |
| 37 | मानवाधिकार आणि महिला सहा प्रा. लक्ष्मण बाबाराव यादव | 117 |
| 38 | बालकांच्या भाषा विकासात आईची भूमिका प्रा.डॉ.स्वप्ना एस.देशमुख | 119 |
| 39 | दलित साहित्यातील (विशेषत: दलित कविता) संशोधन आणि नवकल्पना अभिजीत झाडे | 122 |
| 40 | कविता अध्यापनाचे तंत्र डॉ. वंदना भोयर | 129 |
| 41 | संत नामदेवांची प्रभावळ प्रा. डॉ. दिनेशचंद्र की. राऊत | 132 |
| 42 | महिला सुरक्षा और मानव अधिकार प्रा.डॉ.फरहाना आझमी | 135 |
| 43 | 'बालविकास मे महिलाओं की भूमिका प्रा.सौ.सुषमा सु.जाजु | 139 |
| 44 | Impact Of Ict On Library Services **Dr. Narendra A. Thakare** | 142 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 353 (CCCLIII)
ISSN : 2278-9308
May, 2022

# संत नामदेवांची प्रभावळ

प्रा. डॉ. दिनेशचंद्र की. राऊत
युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय, अमरावती. भ्रमणध्वणी — ९७६४६८८१५८

संत नामदेवांच्या प्रभावळीतील संतांचा अभ्यास करीत असतांना तत्कालीन (तेराव्या चौदाव्या काळाचा) सामाजिक धार्मिक परिस्थितीचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

बाराव्या ते चौदाव्या शतकातील महाराष्ट्रात देवगिरीच्या यादवांचे राज्य होते आणि हा काळ संतचळवळीचा प्रारंभीचा काळ होता. संपूर्ण समाज रसातळाला गेला होता. त्या राज्यात संपूर्ण अराजकता माजली होती राज्यपद्धती निकृष्ट दर्जाची होती म्हणून प्रजा उदासीन झाली होती राजा आणि प्रजा हे दोघेही अधोगतीला गेले होते.

यादव राजाकडे हेमाद्री नावाचा पंडित होता. तो प्रत्यक्ष अप्रत्यक्ष राज्यकारभारातही हस्तक्षेप करीत होता त्या काळातील सर्व ग्रंथ संस्कृतमध्ये होते संस्कृत शिकवण्याचा अधिकार तत्कालीन उच्च वर्णीयांना (ब्राम्हण) होता. धर्माचा अर्थ ते त्यांच्या पद्धतीने काढत होते. हेमाद्री पंडिताने 'चतुवर्ग चिंतामणी' नावाचा ग्रंथ लिहिला त्यात त्याने विविध वर्गातील लोकांसाठी दोन हजारांच्या वर व्रते सांगितले होते. तत्कालीन समाज अज्ञानी असल्यामुळे भीतीपोटी व्रत वैकल्ये करीत होते. तत्कालीन समाजातील लोकांचा वेळ व्रत वैकल्य, उपासतापास, तंत्रमंत्र, भूत पिशाच्च, तारण मारणात, अंधश्रद्धेत जात होता.

मुस्लिमांनी हिंदूधर्मापुढे एक नवे आव्हान निर्माण केलेले होते. इ. स. १३०० मध्ये सुफी धर्मपंथ प्रचारक चर्जरीत्रक्ष आणि त्याचे सातशे साथीदार खडके श्वराला येऊन राहिले. पुढे १३०९ मध्ये चर्जरीवक्षाचा मृत्यू झाला. पुन्हा ऊ्ञ शे सुफी प्रचारक महाराष्ट्रात पाठविण्यास आले. राजकीय आक्रमणापेक्षा हे आक्रमण जास्त धोकादायक होते.

वारकरी संप्रदायातील संतांनी आध्यात्मीक लोकशाही निर्माण करुण तत्कालीन बहुजन समाजाला भक्तीचा मार्ग मोकळा करुन दिला. यातूनच नामदेवांची प्रभावळ उदयास आली त्यात संत सावता माळी निवृत्तीनाय, संत ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, संत नामदेव, संत चोखोबा, संत जनाबाई, संत सोयराबाई, निर्मळा, कर्ममेळा, बंका, संत भागू, संत कान्होपात्रा, संत नरहरी, सोनार, सेनान्हावी इत्यादी संताचा उल्लेख करावा लागेल त्यातील काही महत्वाच्या संताचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला.

**संत नरहरी सोनार —**

एक थोर शिवभक्त म्हणुन पंधरपुरच्या सोनारांची ख्याती होती परंतु एका प्रसंगी 'शिव आणि विष्णु एकाची प्रतिमा, असा स्वानुभव झाल्यानंतर ते वैष्णव पंथात सहभागी झाले त्यांनी आपला व्यवसाय विठ्ठलमय केला होता.

देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ॥
देह बागेसरी जाणे । अंतरात्मा जाण सोने ॥
त्रिगुणाची करुनी मुस । आतओतिला ब्रस ॥
जीव शिव करुनी फुकी । रात्र दिवस ठोका ठोकी ॥

त्यांनी विठ्ठलांचे मनोहारी बर्णन केले आहे

भस्मउटी रुद्रमाका । हाती त्रिशूल नेत्री ज्वाळा गजधर्म व्याघ्रांबरा । कंठी शोभे वसुकी हार

**संत सावता माळी —**

वयाने सर्वश्रेष्ठेसंत सावता माळी होय आपल्या कर्तव्य कर्मावर निष्ठा ठेवून आपल्या व्यवसायालाच हरिरूप मानणारे एक थोरसंत सावता माळी होय. त्यांनी आपले संपूर्ण जीवनच विठ्ठलमय करुण सोडलेले होते. त्यांचे नावावर मोजकेच अभंगआहे . (बारा)

अमुची माळ्याची जात । शेत लावू बागाईत ॥
आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुल झाडा ॥
कांदा मुकाभाजी । अवघी विठाबाई माझी ॥

लसून मिरची कोथिंबीरी । अवघा झाला माझा हरी ॥
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥
सावता म्हणे केला मळा । विठ्ठलाची गोविला मळा ॥

तत्कालीन सामाजिक आणि धार्मिक विषमतेचे हि वर्णन त्यांच्या अभंगात दिसून येते.

भली केली हीन याती। नाही वाढविली महंती ॥

सावता माळ्याची अभंगवाणी ही साधी पण उत्कट आहे

**संत चोखामेळा —**

संत चोखोबाहे महार (शूद्र) जातीतील असून त्यांच्या अभंगाचे विजय विठ्ठल वर्णन, पंढरी महात्म्य, नाम महात्म्य होते त्यांनी संत नामदेवांना गुरयांनी मानले होते पुढे त्यांचे संपूर्ण कुटुंबच विठ्ठलभक्त झाले. तत्कालीन सामाजिक यारी स्थितीचे वर्णन त्यांच्या अभंगातून व्यक्त होतांना दिसते.

शुद्ध चोखामेळा । करी नामाचा सोहळा ।।
यातीहीन मी महार । पूर्वी नीळाचा अवतार ।।
कृष्णनिंदा घडली होती । म्हणोनी महार जन्मप्राप्ती ।।
चोखा म्हणे विटाळ । आम्हा पूर्वीचे ते फळ ।।

ते महार जातीत जन्माला आले असले तरी त्यांची राहणी फार स्वच्छतेची होती.

**संत सोयराबाई —**

संत सोयराबाई ही संतश्रेष्ठ चोखामेळा यांची पत्नी होती. तिने आपल्या पतीलाच गुरु मानले होते. तिला लग्नानंतर फार उशिरा मुल जन्मास आले साक्षात विठ्ठलानेच संत सोयरा बाईचे बाळंतपण निर्मळेचे (बहिण) रूप धारण करुण केले. असा उल्लेख भाऊ लंका यांच्या अभंगात आहे तिने अभंगात स्वत: चा उल्लेख चोख्याची महारी असा केला आहे.

संत सोयराबाई ही हीन यातीत जन्मली असल्यामुळे इतर संताप्रमाणे तिलाही उच्चवर्नियांचा छळ सोसावा लागला. देहाचा विटाळ मानणाऱ्या कर्म लोकांची ती कान उघडणी आपल्या अभंगातून करते. वारकरी संप्रदायाची शिकवण तिने आत्मसात केली असून देहाच्या पलीकडे जाण्या इतकी तिची आध्यात्मिक तयारी झाली आहे ती म्हणते.

देहाची विटाळ म्हणती सकळ । आत्मा तो निर्मळ शुद्ध बुद्ध ।।
देहीचा विटाळ देहीच जन्मला । सोवळा टो झाला कवण धर्म ।।
विटाळ वाचीन उत्पतीचे स्थान । कोणी देह निर्माण नाही जगी ।।
म्हणुनी पांडुरंगा वानितसे थोरी । विटाळ देहांतरी वसतसे ।।
देहीचा विटाळ देहीच निर्धारी । म्हणत महारी चोखोबाची ।।

**संत सेना न्हावी —**

संत सेना न्हावी हे मुळचे जबलपूर जवळील बंधोगड येथील राजाच्या पदरी सेवेत होते ते तिर्थाटन करीत महाराष्ट्रात आले. स्वत:ला ते विठ्ठलाचे दूत म्हणवितात त्यांनी त्यांच्या व्यवसायावरच अभंग व गौळणीची रचना केली आम्ही बारीक बारीक । करू हजामत बारीक ।। हा त्यांचा अभंग प्रसिद्ध झाला.

**संत जनाबाई —**

नामदेवांच्या प्रभावळीतील शेवटची संत जनाबाई संत वाटिकेतील 'आईची वेल' असा तिचा उल्लेख केला जातो तिने स्वत:ला नामदेवांची दासी मानले आहे. तिच्या नावे ३५० अभंग आहे. ती संत नामदेवांच्या घरीच लहानाची मोठी झाली जनाबाईची विठ्ठलावर दृढ श्रद्धा आहे. विठ्ठलाचे अस्तित्व जळी — स्थळी — काष्ठी — पाषाणी असे सर्वज्ञ आहे. देव हा सर्व प्राणीमात्रात व्यापून गेला आहेती आपल्या अभंगात म्हणते.

देव खाते देव पिते । देवावरी मी निजते ।।
देव येथे देव तेथे । देवाविण नाही रीते ।।
जनी म्हणे विठाबाई । भरुनि उरले अंतरही ।।

तिने आपल्या अभंगाच्या माध्यमातून भोंदू साधूवर कडाडून टीका केली आहे.ती म्हणते.

विषयीच्या अभिमाने वाईट कीर्तन । पाखंडी हे म्हणे करिती काया ॥
पंचाक्षरी पाजा करिता हे बुडविली । उद्धरलो म्हणती आम्ही संत ॥

निष्कर्ष –

•संत नामदेवांच्या प्रभावळीतील संतांनी भक्तीचा अधिकार सर्वांना असून तिथे जात, धर्म, पंथ, पद या गोष्टी गौण आहे. हा आदर्श तत्कालीन समाजाला दाखवून दिला.

•संत नामदेवांच्या प्रभावळीतील संतांनी आपल्या अभंगातून आध्यात्मिक लोकशाही, सर्वधर्मसमभाव व समतेचा व मानवतावादाचा विचार मांडला.

•त्यांच्या अभंगातून जन्मश्रेष्ठत्वापेक्षा कर्मश्रेष्ठत्वाला जास्त महत्त्व दिले.

संदर्भ ग्रंथ –

•प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास – लेखक ल. रा. नासिराबादकर

मराठी विभाग प्रमुख
नारायणराव राणा महाविद्यालय,
बडनेरा